उल्हासनगरात अडीच लाखांचे गोमांस जप्त

उल्हासनगर : बजरंग दलच्या कार्यकर्त्यांनी गोमांस घेऊन जाणाऱ्या ट्रक विठ्ठलवाडी पोलिसांना पकडून दिला आहे. दोन लाख ५० हजारांचे गोमांस आणि ट्रक पोलिसांनी जप्त केला आहे. कल्याण वरून उल्हासनगरच्या दिशेने हा गोमांस घेऊन ट्रक येणार असल्याची माहिती बजरंग दलाच्या कार्यकर्त्यांना मिळाली होती. या माहिती वरून आज पहाटे श्रीराम चौकात हा ट्रक येताच कार्यकर्त्यांनी ट्रक अडवून झाडाझडती घेतली असता यात मास आढळून आला.

थो | ड | क्या | त
महत्त्वाचे

अपघातात चिमुकल्याचा मृत्यू; वडिलांवर गुन्हा

पनवेल : कर्नाळा खिंडीत भरधाव दुचाकीवरील नियंत्रण सुटल्याने झालेल्या अपघातात दुचाकीवरील पाच वर्षीय मुलाचा मृत्यू तर त्याचे आई वडील व भाऊ गंभीर जखमी झाल्याची घटना शनिवारी घडली. या घटनेत दुचाकीस्वार असलेल्या मृत मुलाच्या वडीलांनी भरधाव वेगात दुचाकी चालविल्याने हा अपघात झाल्याचे आढळून आले. त्यामुळे पनवेल तालुका पोलिसांनी मृत मुलाच्या वडीलांविरोधात गुन्हा दाखल केला आहे. या अपघातात मृत झालेल्या मुलाचे वडील तेजस पाटील, मृत मुलगा विहान पाटील, सोनल पाटील आणि भाऊ जय असे चौघेजण दुचाकीवरून प्रवास करीत होते.

पामबीचवर अपघात; कारमधील दोघे ठार

नवी मुंबई : वाशीहून पामबीचमार्गे बेलापूरच्या दिशेने जाणारी भरधाव कार रस्ता दुभाजकाचे रेलिंग तोडून वृक्ष व पोलवर धडकून पलटी झाल्याने कारमधील दोघे तरुण जागेवरच ठार तर कार चालक गंभीर जखमी झाल्याची घटना बुधवारी पहाटे अक्षर चौकाजवळ घडली. अतिवेगाने कार चालवल्याने हा अपघात झाल्याचे आढळून आले असून एनआरआय पोलिसांनी या अपघातातील जखमी कार चालकावर गुन्हा दाखल केला आहे. या अपघातात मृत झालेल्यांमध्ये श्रेयस ठोसर आणि हर्षल हटकर या दोघांचा समावेश असून जखमी झालेल्या कार चालकाचे नाव नितीन मॅथ्यू असे आहे.

प्रेमिकेसाठी चोरी

उल्हासनगर : प्रेमिकेला फिरवण्यासाठी मोटारसायकलींची चोरी करणाऱ्या एका तरुणाला विठ्ठलवाडी पोलिसांनी बेड्या ठोकल्या असून त्याच्याकडून तीन गाड्या ताब्यात घेण्यात आल्या आहेत. दिनेश खैरे यांनी ३० एप्रिल रोजी राजी पार्किंगमध्ये दुचाकी उभी केली होती. दुसऱ्या दिवशी सकाळी दुचाकी गायब होती. त्यांनी याप्रकरणी विठ्ठलवाडी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती. सीसीटीव्ही कॅमेऱ्यांच्या मदतीने वरिष्ठ पोलीस निरीक्षक संजय गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली पोलिस पथकाने हर्ष थापा याला अटक केली आहे.

कल्याणात भोंग्याविना, तर मुंब्र्यात भोंग्यावर अजान

प्रतिनिधी/ठाणे/कल्याण

मनसे प्रमुख राज ठाकरे यांनी मशिदींवरील भोंग्यांबाबत आक्रमक भूमिका घेतली आहे. या पार्श्वभूमीवर मशिदींवरील भोंग्यांवर अजान होणार की नाही, याकडे सर्वांचे लक्ष होते. त्यानुसार मुंब्रा भागात भोंग्यावर अजान झाली, तर कल्याणमध्ये भोंग्याविना अजान झाल्याचे दिसून आले आहे.

मुंब्रामध्ये भोंग्यावर अजन झाल्यास दुप्पट आवाजात हनुमान चालीसा लावू, असा इशारा मनसेचे ठाणे जिल्ह्याचे अध्यक्ष अविनाश जाधव यांनी दिला होता. बुधवारी पहाटे मुंब्र्यात भोंग्यावर बांग झाली पण हनुमान चालीसा पठाण झालेच नाही. यामुळे मनसेचा दावा फोल ठरल्याची चर्चा सुरू होती. दरम्यान मंगळवारी रात्रीपासून पोलिसांचा चोख बंदोबस्त असल्याने मनसेचा इशारा हा वाऱ्यातच विरल्याचे बोलले जात आहे.

दुसरीकडे कल्याणमध्ये मशिदीसोबतच मंदिरांबाहेरही पोलीसांचा पहारा असल्याचे दिसून आले. कल्याणात पहाटेची पहिली अजान भोंग्याविना झाली तर इतर अजान कमी आवाजात देण्यात आल्या. आजच्या आंदोलनाच्या पार्श्वभूमीवर पोलिसांनी कल्याणमधील ५० हून अधिक मनसे कार्यकर्त्यांना नोटीसा पाठवल्या होत्या तर २९ कार्यकर्त्यांना पोलिसांनी ताब्यात घेतले होते. बुधवारचा दिवस पोलिसांना कसोटीचा होता मात्र पोलीस यंत्रणा त्यात पूर्णपणे खरी उतरली.

मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी मशिदीवरील भोंग्याबाबत आक्रमक पवित्रा घेतला आहे. मशिदीवरील भोंग्यासमोर हनुमान चालीसा लावण्याचे आवाहन मनसे अध्यक्षांनी मनसे कार्यकर्ते आणि नागरिकांना केले होते. याच पार्श्वभूमीवर शहरात कायदा सुव्यवस्था कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस यंत्रणेने काल रात्रीपासूनच पावले उचलण्यास सुरुवात केली. कल्याण-डोंबिवलीमध्ये ५०हून अधिक मनसे कार्यकर्त्यांना पोलीस यंत्रणेकडून नोटिसा पाठविण्यात आल्या होत्या. यामध्ये मनसे आमदार यांचाही समावेश होता. मंगळवारी रात्री पासूनच मजीद मंदिर परिसरात पोलिसांची गस्त सुरू होती. शहरात काही अनुचित प्रकार घडू नये, यासाठी कल्याणात दुधनाका, चौधरी महोल्ला, मच्छी बाजार, घासबाजार, गोविंदवाडी, बॉंबील बाजार, डॉ. आंबेडकर रोड, रोहिदास वाडा, वाल्लीपीर रोड आदींसह सहजनंद चौक, नेतिवली, इंदिरानगर परिसर आदी परिसरात मशिदी असल्याने पोलिसांकडून विशेष लक्ष ठेवण्यात आले होते.

हनुमान चालीसा पठणास मुंब्र्यात हिंदूंचा विरोध

मुंब्र्यामध्ये मनसेच्या हनुमान चालीसा पठणाला हिंदूनीच विरोध केल्याचे दिसून आले. येथे हिंदू-मुस्लीम नागरिक गुण्यागोदिंदाने नांदत असताना उगाचच विष कालवण्याचे काम करू नका, अशी विनंती दोन्ही समाजातील नागरिकांनी केली आहे. गेल्या ३५ वर्षांहून अधिक काळ मुंब्रा भागात दोन्ही समाजातील नागरिक राहत आहेत. कोणी भडकावू भाषण करत असतील त्याला आम्ही भीक घालत नाही, असे यावेळी राजन केणे यांनी सांगितले.

राबोडीत विनाभोंगा अजान; वागळेत चालीसा पठण

बुधवारी पहाटे होणाऱ्या अजनवर सर्व ठाणेकरांचे लक्ष लागले होते. पण मुंब्रा जामा मशिदीमध्ये कायद्यानिहाय भोंग्यावर बांग झाली, नमाज पठणही झाले. पोलिसांच्या पहाऱ्यामुळे येथे कोणताही अनुचित प्रकार घडला नाही. दरम्यान ठाण्यातील बहुमुस्लीम भाग असलेल्या राबोडीत मशिदींमधून पहाटे विना भोंग्याची अजान झाली. तर वागळे इस्टेट परिसरात मात्र मनसैनिकांनी इंदिरा नगर परिसरातील मशिदीसमोर लांब इमारतीवर भोंगा लावून हनुमान चालीसा पठण केला.

मनसैनिकांची धरपकड

बदलापूरमध्ये आठ जण पोलिसांच्या ताब्यात

बदलापूर : मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनी भोंग्यांच्या मुद्द्यावर दिलेल्या अल्टीमेटमच्या पार्श्वभूमीवर बदलापुरात पोलिसांनी मनसेच्या ८ पदाधिकाऱ्यांना ताब्यात घेतले. मनसेचे बदलापूर शहराध्यक्ष जयेश कदम, शहर संघटक राजू शेट्ये, विभाग अध्यक्ष गणेश पिल्लई, महिला उपजिल्हाध्यक्ष स्नेहा देशपांडे, तालुका संघटक सुदाम कराळे, शहर सचिव दीपक वळंजू,शाखाध्यक्ष सुरेश शिंदे व उपशाखाध्यक्ष राकेश पवार अशा ८ पदाधिकाऱ्यांना पोलिसांकडून ताब्यात घेण्यात आले.

नवी मुंबईत ३० पदाधिकाऱ्यांवर कारवाई

नवी मुंबई : नवी मुंबईतील मनसेच्या पदाधिकाऱ्यांनी मशिदीसमोर आंदोलन करण्याचा प्रयत्न केल्याने पोलिसांनी बुधवारी अनेक पदाधिकाऱ्यांची धरपकड केली. दरम्यान, नवी मुंबईत कुठल्याही प्रकारची अनुचित घटना घडू नये यासाठी नवी मुंबई पोलिसांनी खबरदारी म्हणून परिमंडळ -1 च्या हद्दीतील मनसेच्या ३० प्रमुख पदाधिकाऱ्यांना मंगळवारी ताब्यात घेतले होते. नवी मुंबईत बुधवारी ऐरोली, नेरुळ सानपाडा येथील मशिदीसमोर हनुमान चालीसा वाचून आंदोलन केले. त्यामुळे रबाळे, नेरुळ आणि सानपाडा पोलिसांनी मनसेच्या ११ पदाधिकाऱ्यांवर गुन्हे दाखल केले.

कल्याणमध्ये २९ जण पोलिसांच्या ताब्यात

कल्याण : मनसे अध्यक्षांनी दिलेल्या अल्टिमेटनंतर मनसैनिक चांगलेच आक्रमक झाले होते. त्यामुळे पोलिसांनी कायदा सुव्यवस्था राखण्यासाठी मनसे कार्यकर्ते आणि पदाधिकाऱ्यांची मंगळवारपासून धरपकड करण्यास सुरवात केली. यामध्ये कल्याणातून २९ जणांन ताब्यात घेण्यात आले यात मनसे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांचा समावेश असल्याचे पोलीस उपायुक्तांकडून सांगण्यात आले आहे.

उल्हासनगरमध्ये तडीपारीची कारवाई

उल्हासनगर : उल्हासनगर शहरातून मनसेच्या १३ तर परिमंडळ क्षेत्रातून तब्बल ३२ जणांना ताब्यात घेत न्यायालयात हजर करण्यात आले. त्यावेळी १९ जणांना स्व जातमुचलक्यावर, ११ जणांना १५ हजार रुपयांच्या स्व जातमुचलक्यावर तर दोन जणांना १५ हजार रुपयांच्या स्व जातमुचलक्यासह १५ दिवस शहरात राहण्यास न्यायालयाने बंदी घातली आहे.

भाईंदरमध्ये नाल्यावरील स्लॅब कोसळला

प्रतिनिधी/भाईंदर

भाईंदर पूर्वच्या नवघर नाक्यावर असणाऱ्या हनुमान मंदिराच्या आवारातील नाल्यावरचा स्लॅब मंगळवारी रात्री कोसळला. या घटनेत कोणतीही जीवितहानी झालेली नाही. मात्र या घटनेने मंदिरात येणाऱ्या व परिसरातील लोकांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

नवघर नाक्यावरील हनुमान मंदिरच्या आवारात वयस्कर व्यक्ती, तरुण या मंदिराच्या आवारात बसण्यासाठी येत असतात. लहान मुले मंदिराच्या आवारात खेळण्यासाठी जागा उपलब्ध असल्याने त्या ठिकाणी येत असतात. ज्यावेळी घटना घडली त्यावेळी घटनास्थळी लहान मुले खेळत नसल्यामुळे कोणालाही इजा पोहचली नाही. मंदिराच्या आवारातच व्यायाम शाळा देखील आहे. नवघर परिसरातील अनेक मुले या ठिकाणी व्यायाम करण्याकरिता येत असतात. हनुमान मंदिराच्या आवारात असणाऱ्या गटारावर १० ते १५ वर्षांपूर्वी

स्लॅबचे काम करण्यात आले होते. मात्र गटाराचे स्लॅब कोसळल्या नंतर काम कोणत्या दर्जाचे करण्यात आले होते, याची चर्चा स्थानिक नागरिक करत आहेत. गटाराचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले असून बाजूलाच असणाऱ्या गोदावरी इमारतीची सुरक्षाभिंत देखील या घटनेत काही प्रमाणात पडली आहे. स्थानिक नगरसेविका वंदना पाटील यांनी सांगितले की, सदर स्लॅब कमकुवत झाल्याबाबत सातत्याने महापालिकेस पत्रे दिली. गेल्या अनेक वर्षांच्या पाठपुराव्या नंतर आता कुठे निविदा काढली आहे. या दुर्घटनेला महापालिकेची दिरंगाई कारणीभूत असल्याचे त्या म्हणाल्या.

गृहकर्जावरील व्याजदरात वाढ करण्यात येऊ नये - जितेंद्र मेहता

प्रतिनिधी/ठाणे

रिझर्व्ह बँक ऑफ इंडियाच्या चलन विषयक धोरण समितीने रेपोरे दरात वाढ केली असल्याने गृहकर्जाचे दर वाढण्याची शक्यता आहे. याचा मोठा परिणाम रिअल इस्टेट व्यवसायावर होणार असल्याने याचा विचार करून वाढलेल्या रेपोदराचा फेरविचार करण्यात यावा, तसेच आर्थिक संस्था आणि बँकांनी गृह कर्जावरील व्याज दरात वाढ करू नये, अशी मागणी क्रेडाई-एमसीएचआय ठाणेचे अध्यक्ष आणि प्रसिद्ध विकासक जितेंद्र मेहता यांनी केली आहे.

रिझर्व्ह बँक ऑफ इंडिया (आरबीआय)च्या चलनविषयक धोरण समितीच्या नुकत्याच झालेल्या बैठकीत पॉलिसी रेपो दर ४० बीपीएसने वाढवून ४.४० टक्के करण्याची शिफारस करण्यात आली आहे. मात्र यामुळे गृहकर्जावरील व्याज वाढल्यास त्याचा परिणाम रिअल इस्टेट उद्योगाच्या भवितव्यावर होणार आहे. त्यामुळे या रेपोदराचा फेरविचार होण्याची आवश्यकता आहे. विशेष म्हणजे एचडीएफसी आणि एचडीएफसी बँकेच्या अलीकडेच विलीनीकरणामुळे, ज्यांनी एचडीएफसीकडून गहाण ठेवून घरे खरेदी केली आहेत त्यांच्या गृहकर्जाच्या व्याजदरांवर परिणाम झाला आहे. त्यामुळे सध्या कमी असलेले गृहकर्जावरील व्याज जे कमी आहेत, त्याच पद्धतीने ते आकारण्याची आवश्यकता आहे. बँका आणि आर्थिक संस्थांनी व्याज दरात वाढ करू नये, अशी मागणी मेहता यांनी केली आहे.

बनावट नोटांप्रकरणी कल्याणमध्ये तिघांना अटक

कल्याण : कल्याण स्टेशन परिसरातील एसटी स्टॅण्ड गेटवर बनावट नोटा वटविण्यासाठी आलेल्या त्रिकुटला मगंळवारी रात्री महात्मा फुले पोलिसांनी पकडले आहे.

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार कल्याण रेल्वे स्टेशन परिसरात पेट्रोलिंग करीत असलेल्या पोलिसांना एसटी स्टॅण्ड, इनगेट वर काही तरुण भारतीय बनावट चलनी नोटा वटविण्यासाठी येणार असल्याची माहिती मिळाल्यावरून मगंळवारी रात्री स.पो.नि. दीपक सरोदे, पो.हवा. भालेराव, पो.ना. सुचित टिकेकर, पो.ना. रवींद्र हसे, पो.ना. सुमीत मदाळे, पो.ना. भोईर यांनी याठिकाणी सापळा लावला. यावेळी रजनेश कुमार चौधरी, हर्षद नौशद खान, अर्जुन कुशवह या तिघांना ताब्यात घेत त्यांची झडती घेतली असता त्यांच्याकडून भारतीय चलनातील ५०, १००, २०० रूपये दराच्या एकूण २५,००० बनावट नोटा मिळून आल्या. तसेच त्यांच्याकडील मोबाईल फोन व स्कुटी पोलिसांनी जप्त केली आहे. या प्रकाराबाबत सरकारतर्फे दिलेल्या फिर्यादीवरून आरोपींविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास सपोनि दीपक सरोदे करीत आहेत.

जल जीवन मिशनमधून पाणीपुरवठा योजना मार्गी

कल्याण, अंबरनाथकरांची पाणी प्रतीक्षा संपली

वार्ताहर/कल्याण

कल्याण लोकसभा मतदारसंघातील कल्याण आणि अंबरनाथ तालुक्याच्या ग्रामीण भागामध्ये स्वतंत्र पाणीपुरवठा योजना उभारण्याच्या खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांच्या प्रयत्नांना अखेर यश आले आहे. जलजीवन मिशनच्या माध्यमातून या दोन्ही तालुक्यातील विविध गावांसाठी लवकरच निविदा जाहीर केल्या जाणार आहेत. त्यामुळे दोन्ही तालुक्यांची अनेक दशकांची पाणी प्रतीक्षा संपली असून या गावांमध्ये स्वतंत्र पाणी योजना राबविण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. कल्याण लोकसभा मतदारसंघातील ही गावे पाण्याच्या बाबतीत संपन्न होणार आहेत.

कल्याण लोकसभा मतदारसंघातील शहरी

भागातील पाण्याचा प्रश्न मिटल्यानंतर खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी ग्रामीण भागातील पाणीपुरवठा योजना राबवण्यावर आपले लक्ष केंद्रित केले. त्या ठिकाणी पाणीपुरवठ्यासाठी अशा योजना मंजूर करून घरोघरी पाणी देण्याचा खासदार डॉक्टर श्रीकांत शिंदे यांचा प्रयत्न सुरू आहे. इतकेच नव्हे तर ठाणे जिल्ह्यातील सर्वात उंच ठिकाण असलेल्या मलंगगड भागात पाणी पोहोचवण्यासाठी लाखो रुपयांची स्वतंत्र पाणीपुरवठा योजना खासदार डॉ. श्रीकांत शिंदे यांनी मंजूर करून घेतली आहे. या मोहिमेचा पुढचा भाग कल्याण आणि अंबरनाथ तालुक्यातील ग्रामीण भागातील पाणीपुरवठा योजनांकडे पाहिले जात होते. पाणी योजनांसाठी जल जीवन मिशनच्या माध्यमातून निधी मिळण्यासाठी खासदार शिंदे यांनी पाठपुरावा केला होता. शिंदे यांनी जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी भाऊसाहेब दांगडे यांच्याकडे निधी उपलब्ध करून देण्याची मागणी केली होती. त्यानंतर कार्यकारी अधिकाऱ्यांनी गावांची पाहणी करत त्याचा सविस्तर प्रकल्प अहवालही तयार केला होता.

TATA

TATA STEEL LIMITED

Registered Offce: Bombay House, 24, Homi Mody Street, Fort, Mumbai - 400 001 India
Tel.: 91 22 6665 8282 • Fax No.: 91 22 6665 7724 • Email: cosec@tatasteel.com • Website: www.tatasteel.com
CIN: L27100MH1907PLC000260

सूचना

३१ मार्च, २०२२ रोजी संपलेल्या तिमाही/बारा महिन्यांसाठी अलिप्त वित्तीय निष्कर्षांचा उतारा

₹ कोटी

तपशील	३१.०३.२०२२ रोजी संपलेली तिमाही	३१.१२.२०२१ रोजी संपलेली तिमाही	३१.०३.२०२१ रोजी संपलेली तिमाही	३१.०३.२०२२ रोजी संपलेले आर्थिक वर्ष	३१.०३.२०२१ रोजी संपलेले आर्थिक वर्ष
	लेखापरिक्षित	लेखापरिक्षित	लेखापरिक्षित	लेखापरिक्षित	लेखापरिक्षित
प्रवर्तनातून एकूण महसूल	३६,६८०.९३	३१,९६४.२५	२७,३५५.४३	१,२९,०२१.३५	८४,१३२.९२
कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (कर आणि अपवादात्मक बाबींपूर्वी)	१०,७१५.०४	१०,४४३.६६	९,५८८.९६	४४,३२६.१०	१७,८६८.५४
कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक बाबींनंतर)	१०,६३८.५९	१०,२६२.६९	१०,५३८.२२	४४,०९०.६५	१८,६०९.८४
कालावधीसाठी करोत्तर निव्वळ नफा/(तोटा)	७,८३९.४६	७,६८३.३९	८,१२९.६५	३३,०११.१८	१७,०७७.९७
कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीसाठी नफा/(तोटा) (करोत्तर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करोत्तर) धरून)	८,१८७.१५	७,८३६.९९	८,४९३.५३	३३,७०६.०८	१७,४८९.३८
भरणा झालेले समभाग भांडवल (दर्शनी मूल्य ₹ १० प्रति भाग)	१,२२२.३७	१,२२२.३३	१,१९८.७८	१,२२२.३७	१,१९८.७८
पुनर्मुल्यांकित राखीव वगळून राखीव				१,२४,२११.३९	९३,२११.३४
सिक्युरिटीज प्रिमियम रिझर्व्ह				३१,२८८.८९	३०,९६४.७६
नेट वर्थ	१,२५,४३३.७६	१,१७,२४४.१७	९५,१८५.१२	१,२५,४३३.७६	९५,१८५.१२
भरणा झालेले कर्ज भांडवल				१३,६७४.९९	१३,५६७.६०
निव्वळ डेब्ट इक्विटी रेशो	०.३०	०.२७	०.३२	०.३०	०.३२
प्रत्येकी ₹ १० ची मूलभूत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर)	६४.१४	६२.८८	६९.२८	२७०.३३	१४५.००
प्रत्येकी ₹ १० ची सौम्यिकृत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर)	६४.१२	६२.८५	६८.८८	२७०.१३	१४४.९९
डिबेंचर विमोचन राखीव	२,०४६.००	२,०४६.००	२,०४६.००	२,०४६.००	२,०४६.००
डेब्ट सर्व्हिस कव्हरेज रेशो	१०.८२	१६.०६	५.५५	१४.३६	३.६०
इंटरेस्ट सर्व्हिस कव्हरेज रेशो	२८.८३	२३.१६	१४.५६	२२.८४	५.८१

३१ मार्च, २०२२ रोजी संपलेल्या तिमाही/बारा महिन्यांसाठी एकत्रित वित्तीय निष्कर्षांचा उतारा

₹ कोटी

तपशील	३१.०३.२०२२ रोजी संपलेली तिमाही	३१.१२.२०२१ रोजी संपलेली तिमाही	३१.०३.२०२१ रोजी संपलेली तिमाही	३१.०३.२०२२ रोजी संपलेले आर्थिक वर्ष	३१.०३.२०२१ रोजी संपलेले आर्थिक वर्ष
	अलेखापरिक्षित	अलेखापरिक्षित	अलेखापरिक्षित	लेखापरिक्षित	लेखापरिक्षित
प्रवर्तनातून एकूण महसूल	६९,३२३.५०	६०,७८३.११	५०,०२८.३७	२,४३,९५९.१७	१,५६,४७७.४०
कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (कर आणि अपवादात्मक बाबींपूर्वी)	१२,१३९.२६	१२,३५८.९८	१०,३४७.९९	५०,३६०.९३	१४,८८६.८५
कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक बाबींनंतर)	११,८६४.९७	१२,१६५.५८	९,३५६.८६	५०,२२६.८७	१३,८४३.६९
कालावधीसाठी करोत्तर निव्वळ नफा/(तोटा)	९,८३५.१२	९,५९८.१६	७,१६१.११	४१,७४९.३२	८,१८९.७९
कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीसाठी नफा/(तोटा) (करोत्तर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करोत्तर) धरून)	१०,३५३.७४	१०,४८५.४६	६,१३१.०३	४३,०५४.७४	९७८.७८
भरणा झालेले समभाग भांडवल (दर्शनी मूल्य ₹ १० प्रति भाग)	१,२२१.२१	१,२२१.१७	१,१९७.६१	१,२२१.२१	१,१९७.६१
राखीव (पुनर्मुल्यांकित राखीव वगळून) आणि अनियंत्रक व्याज				१,१५,८७७.२५	७५,५३५.८४
नेटवर्थ	१,१४,४४३.०४	१,०४,१८२.७१	७४,२३८.७७	१,१४,४४३.०४	७४,२३८.७७
निव्वळ डेब्ट इक्विटी रेशो	०.५२	०.६८	०.९८	०.५२	०.९८
प्रति समभाग प्राप्ती					
प्रत्येकी ₹ १० ची मूलभूत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर)	७९.९१	७९.१०	५७.५३	३३२.३५	६३.७८
प्रत्येकी ₹ १० ची सौम्यिकृत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत अपवादात्मक बाबींनंतर)	७९.८८	७९.०६	५७.१९	३३२.०९	६३.७८
डिबेंचर विमोचन राखीव	२,०४६.००	२,०४६.००	२,०४६.००	२,०४६.००	२,०४६.००
डेब्ट सर्व्हिस कव्हरेज रेशो	९.७४	९.३७	४.३६	९.१८	२.२३
इंटरेस्ट सर्व्हिस कव्हरेज रेशो	१७.५९	१२.५७	८.२९	१२.८२	३.३९

टीप :
सेबी (लिस्टिंग अँड अदर डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ आणि रेग्युलेशन ५२ अंतर्गत स्टॉक एक्स्चेंजेसमध्ये सादर केलेल्या ३१ मार्च, २०२२ रोजी संपलेल्या तिमाही/बारा महिन्यांसाठी अलिप्त आणि एकत्रित वित्तीय निष्कर्षांच्या तपशीलवार विवरणाचा वरील एक उतारा आहे. ३१ मार्च, २०२२ रोजी संपलेल्या तिमाही/बारा महिन्यांसाठी अलिप्त आणि एकत्रित निष्कर्षांचे संपूर्ण विवरण स्टॉक एक्स्चेंजेसच्या वेबसाईट्स् (www.nseindia.com/www.bseindia.com) आणि कंपनीची वेबसाईट (www.tatasteel.com) वर उपलब्ध आहे.

टी. व्ही. नरेंद्रन
मुख्य कार्यकारी अधिकारी आणि
व्यवस्थापकीय संचालक

कौशिक चॅटर्जी
कार्यकारी संचालक आणि
मुख्य वित्तीय अधिकारी

मुंबई : ०३ मे, २०२२

TATA STEEL

रशियाकडून खनिज तेलाच्या आयातबंदीस हंगेरीचा विरोध

वृत्तसंस्था, बुडापेस्ट

रशियाकडून खनिज तेल आयात करण्यावर बंदी घालण्याच्या युरोपीयन महासंघाच्या निर्णयाला आपण पाठिंबा देणार नसल्याचे हंगेरीने सांगितले. हंगेरीचे परराष्ट्रमंत्री पीटर शिजार्तो यांनी स्पष्ट केले, की युरोपीयन महासंघाच्या या निर्णयामुळे हंगेरीचा इंधन पुरवठा पूर्णपणे उद्ध्वस्त होण्याची भीती आहे. यामुळे युक्रेनवरील आक्रमणामुळे रशियावर दबाव टाकण्याच्या युरोपीयन महासंघांच्या प्रयत्नांना खीळ बसणार आहे.

समाजमाध्यमांवर प्रसारित केलेल्या ध्वनिचित्रफितीत शिजार्तो यांनी बुधवारी सांगितले, की रशियाकडून इंधन आयात बंद केल्यास हंगेरीला आपली अर्थव्यवस्था सुरळीत राखणे अत्यंत कठीण जाईल. युरोपीयन महासंघाचे अध्यक्षा उर्सुला वॉन डेर लेन यांनी प्रतिबंधांच्या सहाव्या टप्प्यात महासंघाच्या सदस्य देशांनी सहा महिन्यांत रशियाकडून कच्चे खनिज तेल आणि वर्षाखेरपर्यंत त्याची शुद्ध उत्पादने आयात करणे बंद करावे असा प्रस्ताव मांडला आहे.

युरोपियन महासंघांचा हा प्रस्ताव एकमताने मंजूर झाल्यासच प्रभावी ठरणार आहे. मात्र, या प्रस्तावाला हंगेरी आणि स्लोवाकियाच्या सरकारांनी विरोध केल्याने महासंघाच्या या प्रयत्नांत मोठा अडथळा निर्माण झाला आहे.

जागतिक प्रश्नांवर विचारविनिमय

नॉर्डिक देशांच्या प्रमुखांशी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची चर्चा

पीटीआय, कोपनहेगन

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी बुधवारी नॉर्वे, स्वीडन, आइसलँड आणि फिनलँडच्या (नॉर्डिक देश) पंतप्रधानांशी स्वतंत्र चर्चा केली. यावेळी उभय पक्षांचे संबंध दृढ करण्यासह प्रादेशिक आणि जागतिक स्तरावर होत असलेल्या घडामोडींबाबत विचारविनिमय केला.

डेन्मार्कमध्ये जर्मनीहून मंगळवारी आल्यानंतर मोदींनी युरोप दौऱ्याच्या दुसऱ्या टप्प्यात नॉर्डिक देशांच्या चारही प्रमुखांची भेट घेऊन ही चर्चा केली. डेन्मार्कची राजधानी कोपनहेगनमध्ये होत असलेल्या दुसऱ्या भारत-नॉर्डिक परिषदेच्या पार्श्वभूमीवर या भेटी झाल्या. मोदीनी नॉर्वेचे पंतप्रधान जोनास गहर स्टोर यांची सर्वप्रथम भेट घेतली. दोन्ही नेत्यांतील ही पहिलीच भेट होती. दोन्ही देशांच्या संबंधांचा त्यांनी साकल्याने आढावा घेतला. या भेटीनंतर मोदींनी ट्विटमध्ये म्हटले आहे, की सागरी अर्थव्यवस्था, पर्यावरणानुकूल ऊर्जा, अवकाश, आरोग्य आदी क्षेत्रांत परस्परसहकार्य वाढवण्याच्या दृष्टीने चर्चा केली.

भारत आणि नॉर्वे संयुक्त राष्ट्र संघटनेच्या सुरक्षा परिषदेचे सदस्य असल्याने या व्यासपीठावर उभय देशांच्या हितसंबधित जागतिक बाबींवर संवाद होत असतो. दोन्ही नेत्यांत पर्यावरणानुकूल इंधन, सौर आणि पवनऊर्जा, मत्स्यव्यवसाय, जलव्यवस्थापन यांवर चर्चा झाली.

त्यानंतर स्वीडनच्या पंतप्रधान मॅगडलिना अँडरसन यांच्याशी मोदींची चर्चा झाली. या नेत्यांची प्रथमच भेट झाली. दोन्ही नेत्यांनी उभयपक्षीय संबंधांसह संयुक्त कृती योजनेच्या प्रगतीवर संवाद साधला. माहिती-तंत्रज्ञान, संशोधन आणि नाविन्यपूर्ण उपक्रमांवर यावेळी चर्चा झाली. दोन्ही देशांतील दृढ संबंधांचा दोन्ही देशांच्या नागरिकांना नक्की लाभ होईल, असे ट्विट मोदींनी यानंतर केले. २०१८ मध्ये मोदींनी स्वीडनला भेट दिली तेव्हा स्वीडन आणि भारताने संरक्षण, व्यापार व गुंतवणूक, पर्यावरणानुकूल ऊर्जा, स्मार्ट सिटी, स्त्रियांचा कौशल्यविकास, अवकाश तंत्रज्ञान, आरोग्य आदी व्यापक स्तरावरील क्षेत्रांत संयुक्त कृती योजना स्वीकारली होती. संयुक्त नवोपक्रम भागीदारी करारावरही दोन्ही देशांनी स्वाक्षऱ्या केल्या होत्या. संयुक्त कृती योजनेच्या प्रगतीचा आढावा दोन्ही नेत्यांनी घेतला. सप्टेंबर २०१९ मध्ये सुरू केलेल्या 'लीडरशिप ग्रुप ऑन इंडस्ट्री' (लीड आयटी) या दोन्ही देशांच्या संयुक्त प्रकल्पाच्या प्रगतीबाबत दोन्ही नेत्यांनी समाधान व्यक्त केले. संयुक्त राष्ट्र संघटनेच्या पर्यावरणविषयक कृती परिषदेत दोन्ही देशांनी पुढाकार घेऊन हा प्रकल्प सुरू केला होता. जगातील सर्वाधिक हरितगृह वायू प्रदूषण करणाऱ्या उद्योगांना कार्बनचे कमीत कमी उत्सर्जन करण्यासाठी यात मार्गदर्शन करण्यात येते. या प्रकल्पात १६ देश आणि १९ कंपन्यांसह ३५ सदस्य झाले आहेत.

मोदींनी त्यानंतर आईसलँडच्या पंतप्रधान केट्रिन याकोबस्दोत्तिर यांच्याशी चर्चा केली. भूऔष्णिक ऊर्जा, सागरी अर्थव्यवस्था, आर्क्टिक्ट, मत्स्यव्यवसाय, अन्नप्रक्रिया, डिजिटल विद्यापीठांसह शिक्षण व सांस्कृतिक देवाणघेवाणीवर दोन्ही नेत्यांनी चर्चा केली.



व्यापार, तंत्रज्ञान, गुंतवणूक...

मोदींनी फिनलँडच्या पंतप्रधान सॅना मरिन यांची भेट घेऊन व्यापार, तंत्रज्ञान, गुंतवणूक आदी क्षेत्रांत दोन्ही देशांचे संबंध अधिक वृद्धिंगत होण्यासाठी चर्चा केली. भारत-फिनलँडदरम्यान डिजिटल भागीदारी, व्यापार भागीदारी आणि गुंतवणूक व्यवहारांत विस्ताराच्या भरपूर संधी आहेत. आम्ही दोन्ही देशांचे सांस्कृतिक संबध अधिक दृढ करण्याबाबत आम्ही चर्चा केली, असे ट्विट मोदींनी केले आहे.

२०२०मध्ये ८१.१६ लाख मृत्यूंची नोंद

करोनामुळे मृतांच्या संख्येत सहा टक्क्यांनी वाढ

एक्स्प्रेस वृत्तसेवा, नवी दिल्ली

२०२० साली देशात ८१.१६ लाख मृत्यूंची नोंद झाल्याचे महानिबंधकांच्या (रजिस्ट्रार जनरल) कार्यालयाने मंगळवारी जारी केलेल्या नव्या आकडेवारीत म्हटले आहे. आधीच्या वर्षीपेक्षा करोना महासाथीच्या वर्षात नोंदला गेलेला हा आकडा ६ टक्क्यांनी अधिक असून, देशात जन्म व मृत्यू यांच्या वाढत्या नोंदणीचा अलीकडचा कल पाहता त्याच्याशी तो सुसंगत आहे.

२०२० सालची जन्मनोंदणी २०१९ सालच्या २.४८ वरून कमी होऊन २.४२ कोटींवर आली; तर २०१९ साली झालेली मृत्यू नोंदणी वाढून ८१.१६ लाख झाली, असे नागरी नोंदणी यंत्रणेतील (सिव्हिल रजिस्ट्रेशन सिस्टीम- सीआरएस) आकडेवारीतून दिसून आले आहे.

हे २०२० सालातील देशातील जन्म व मृत्यू यांचे वास्तविक आकडे नसून, केवळ नोंदणी झालेल्या जन्म व मृत्यूंची आकडेवारी आहे. अलीकडच्या काही वर्षांमध्ये जन्म व मृत्यू यांच्या नोंदणीत हळूहळू वाढ होत आहे. गेल्या तीन वर्षांत विशेषतः मृत्यू नोंदणीत मोठी वाढ झाली आहे. उदाहरणार्थ, २०१९ साली देशात झालेल्या मृत्यूंपैकी ९२ टक्के मृत्यूंची नोंद झाली. त्याच्या दोन वर्षे आधी (२०१७) साली झालेल्या ७९ टक्के नोंदणीच्या तुलनेत ही उल्लेखनीय वाढ होती. आता सर्व जन्मांपैकी जवळपास ९५ टक्के जन्मांची नोंदणी केली जाते.

२०२०च्या मृत्यूच्या आकडेवारीला विशेष महत्त्व असण्याचे कारण, या वर्षी करोनामुळे मोठ्या संख्येत झालेले मृत्यू. अधिकृत आकडेवारीनुसार, २०२०मध्ये १.४९ लाख करोनामुळे मरण पावले. आजच्या आकडेवारीचा विचार करता, ५.२३ लाखांहून अधिक लोक करोनामुळे मरण पावले असल्याची माहिती आहे.

जोधपूर दंगलप्रकरणी १४१ अटकेत

जयपूर : राजस्थानच्या जोधपूर शहरात ईदच्या सणापूर्वी झेंडे लावण्याच्या मुद्यावरून झालेल्या धार्मिक संघर्षाच्या संबंधात आतापर्यंत १४१ लोकांना अटक करण्यात आली असून, बुधवारी दुसऱ्या दिवशी या शहरातील संचारबंदी कायम होती. शहरातील परिस्थिती आता नियंत्रणात असून हिंसाचाराच्या कुठल्याही नव्या घटनेची नोंद झालेली नाही, असे पोलिसांनी सांगितले. कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी सुमारे १ हजार पोलीस तैनात करण्यात आले आहेत. यापूर्वी, बुधवारी मध्यरात्रीपर्यंत संचारबंदी लागू करणारा, तसेच मोबाईल इंटरनेट सेवा स्थगित करण्याचा आदेश अधिकाऱ्यांनी जारी केला होता.

कालनिर्णय
आयोजित
पाकनिर्णय स्पर्धा २०२३
स्पर्धेचे विभाग
• वाळवणाचे पदार्थ
• कंदमुळांपासून बनवलेले पदार्थ
• सूप • आइस्क्रीम
पाककृती पाठविण्याची अंतिम तारीख : ३१ मे २०२२
पत्ता : पाकनिर्णय २०२३, सुमंगल प्रेस प्रा. लि. १७२, एम.एम.जी.एस.मार्ग, दादर (पू.), मुंबई - ४०० ०१४.
फोन नं. : ०२२-२४१३४८८४ / ५०५१
www.kalnimay.com/paknimay

www.tanviherbals.com
माझ्या कुटुंबाचा स्वास्थ्यरक्षक
आम्ही रोज घेतो 2 तन्वीशता टॅबलेट्स
तेजस्वी त्वचा, दाट केस, शक्तीस्फूर्तीसाठी
शांत झोप, आनंदी मन, निरोगी जीवनासाठी
ॲसिडिटी, थकवा, डोकेदुखी इ वर
Tanvi HERBALS
TANVISHATAA
सर्व तन्वी औषधे केमिस्टकडे व तन्वी क्लिनिक्समध्ये उपलब्ध
6 व 7 मे रोजी सर्व आरोग्य तक्रारींवर तन्वी फ्री चेकअप महाकॅंप आजच नाव नोंदणी करा

6 मे	डीजी आयुर्वेद, अंधेरी दर शुक्र.	4:00 ते 6:00	022-26716964
7 मे	अमृत आयुर्वेद, मुलुंड	4:00 ते 6:00	9870437656
7 मे	शतायु आयुर्वेद, पुणे	11:00 ते 2:00	9881199233
7 मे	स्वरा आयुर्वेद, खारघर	11:00 ते 1:00	8087426179
7 मे	लक्ष्मी आयुर्वेद, डोंबिवली	6:00 ते 8:00	9820339582

तन्वी क्लिनिक रोज फ्री चेकअप : घंटाळी ठाणे 9769695892, दादर 9833683621
भेटा दर शुक्र. डॉ. रुचा यांना ठाणे व दर गुरु. डॉ. धामणकर यांना दादर येथे
9820075812 वर फ्री व्हाट्सअप आरोग्य सल्ला मिळवा तसेच तन्वी बुक पीडीएफ मिळवा

AURIC
AURANGABAD INDUSTRIAL TOWNSHIP LIMITED
(A Government Undertaking)
Regd. Office : Udyog Sarathi, MIDC Office, Marol Industrial Area, Andheri East, Mumbai - 400 093 | Tel. No. 022-26879956
Website: www.auric.city | CIN: U74999MH2014SGC260132
Aurangabad Industrial Township Limited (AITL) which is an SPV Company formed between MIDC and NICDCL invites "RFQ-cum-RFP" from interested bidders for Programme Manager for New Cities (PMNC) for Dighi Industrial Area (DPIA) in Maharashtra, under The Delhi-Mumbai Industrial Corridor (DMIC) Project".
(Tender No.: AITL / DPIA / 2022-23 / 001)
The details are available on the websites: https://aitl.eproc.in, www.auric.city. Interested applicants are requested to submit their responses to the RFQ-cum-RFP at the address mentioned below on or before 3:00 PM (IST), 20th May 2022.
Sd/-
Managing Director, AITL

तक्रारदार अल्पवयीन मुलीवर पोलिसाचाच बलात्कार; सहा अटकेत

पीटीआय, ललितपूर

चार जणांनी बलात्कार केल्याच्या गुन्ह्याची तक्रार दाखल करण्यासाठी पोलीस ठाण्यात आलेल्या एका १३ वर्षीय अल्पवयीन मुलीवर पोलीस ठाणेदारानेच बलात्कार केला. उत्तर प्रदेशातील ललितपूर येथे ही घटना घडली असून याप्रकरणी या पोलीस ठाणेदारासह सहा जणांना अटक करण्यात आली आहे. बलात्कार करणारा ठाणेदार फरार झाला होता. मात्र त्याला बुधवारी सायंकाळी प्रयागराज येथून अटक करण्यात आली.

ललितपूरमधील या अल्पवयीन मुलीला चार जणांनी २२ एप्रिल रोजी भोपाळला नेले आणि तीन दिवस तिच्यावर बलात्कार केला. त्यानंतर या आरोपींनी या मुलीला ललितपूरमधील पाली पोलीस ठाण्याजवळ आणून सोडले. ही मुलगी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल करायला गेली असता तिथे पोलीस ठाण्याचा प्रमुख तिलकधारी सरोज याने तिला एका खोलीत डांबून ठेवले आणि तिच्यावर बलात्कार केला. हे प्रकरण वरिष्ठांकडे गेल्यानंतर हा ठाणेदार फरार झाला. पोलिसांनी या मुलीवर बलात्कार करणाऱ्या चार जणांना अटक केली. या मुलीच्या मावशीलाही सहआरोपी करण्यात आले आहे, अशी माहिती पोलीस अधिकाऱ्यांनी दिली. फरार झालेल्या सरोजला प्रयागराज येथून अटक करण्यात आली.

दरम्यान, पाली पोलीस ठाण्यातील सर्व पोलीस कर्मचाऱ्यांना निलंबित करण्यात आले आहे. उत्तर प्रदेशचे उपमुख्यमंत्री ब्रजेश पाठक यांनी आरोपींवर कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले असून राष्ट्रीय सुरक्षा कायद्यानुसार या आरोपींवर कारवाई करण्यात येणार असल्याचे सांगितले.

संघ पदाधिकाऱ्याच्या हत्येप्रकरणी २० आरोपींना अटक

पालक्काड : केरळच्या पालक्काड जिल्ह्यात गेल्या महिन्यात झालेल्या रा.स्व. संघाच्या एका नेत्याच्या हत्येच्या संबंधात आणखी चार जणांना अटक करण्यात आल्यामुळे, या प्रकरणात आतापर्यंत अटक करण्यात आलेल्या आरोपींची एकूण संख्या २० वर गेली आहे. मंगळवारी सायंकाळी ज्या चौघांना अटक करण्यात आली, त्यापैकी एक जण १६ एप्रिल रोजी संघाचे पदाधिकारी एस. के. श्रीनिवासन (४५) यांची हत्या करणाऱ्या सहा जणांच्या गटाचा भाग होता. या हल्लेखोर गटातील दोघे जण अद्याप फरार आहेत. या प्रकरणी अटक करण्यात आलेले सर्व वीसही जण पॉप्युलर फ्रंट ऑफ इंडिया (पीएफआय) या संघटनेचे किंवा तिची राजकीय आघाडी सोशल डेमॉक्रॅटिक पार्टी ऑफ इंडियाचे (एसडीपीआय) कार्यकर्ते आहेत.

Exclusive Handloom Expo
Jharokha
"CELEBRATING CRAFTS OF INDIA"
OF HANDLOOM PRODUCTS ON THE OCCASION OF
"AZADI KA AMRIT MAHOTSAV"
ORGANISED BY WEAVERS SERVICE CENTRE, MUMBAI
:VENUE:
SWAMINARAYAN MANDIR (OLD),
60 FEET, AMBADI ROAD, VASAI (WEST) HARISEVADASJI SWAMI, SAI NAGAR, VASAI WEST, NAVGHAR-MANIKPUR, MAHARASHTRA-401202
DATE: 01-05-2022 TO 10-05-202 TIME: 11:00 AM TO 09:00 PM
AN EXCLUSIVE HANDLOOM PRODUCTS UNDER ONE ROOF
*SAREE *DRESS MATERIAL *STOLE *DUPATTA *BED SHEET *WALL HANGING
SPONSORED BY: O/o THE DEVELOPMENT COMMISSIONER (HANDLOOMS), UDYOG BHAVAN, NEW DELHI-110 011
*TOWEL *TABLE COVER *NAPKIN *DURIE *ASAN PATTI *FURNISHING

दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई
(दि विदर्भ को-ऑपरेटिव्ह बँक लि., सम्मिलित)
शेड्युल्ड बँक
मुख्य कचेरी :- (सर विठ्ठलदास ठाकरसी स्मृती भवन,)१, महाराष्ट्र चेंबर ऑफ कॉमर्स लेन, फोर्ट, मुंबई ४०० ००१, पोस्ट बॉक्स नं.४७२, फोन.नं. ११-०२२-६१८०१९५१,१९५२/२२८७६०१५ ते २० वेबसाइट: https://mscbank.com

चल व अचल मालमत्ता विक्रीसाठी / भाडयाने देण्याबाबतची निविदा सुचना

दि महाराष्ट्र स्टेट को-ऑप.बँक लिमिटेड मुंबई **"सेक्युरिटायझेशन ॲण्ड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फिनान्शिअल ॲसेटस ॲन्ड एन्फोर्समेन्ट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट (सरफेसी) ॲक्ट २००२"** नुसार १० सहकारी साखर कारखाने व ०१ सहकारी सूत गिरणी व ०१ प्रक्रिया संस्था या कर्जदार संस्थांच्या मालमत्तेची विक्रीसाठी ०१ प्रक्रिया संस्था व १० साखर कारखाना व १ सूत गिरणी या कर्जदार संस्थांची मालमत्ता भाडयाने देणेसाठी मोहोरबंद निविदा मागवित आहेत.

भाडयाने द्यावयाच्या संस्था

क्र.१) गंगापूर सहकारी साखर कारखाना लि., रघुनाथ नगर, तालुका-गंगापूर, जिल्हा -औरंगाबाद, क्र.२) विनायक सहकारी साखर कारखाना लि., वैजापूर, जिल्हा-औरंगाबाद, क्र.३) जिजामाता सहकारी साखर कारखाना लि., दुसरबीड, ता-सिंदखेडराजा, जिल्हा-बुलढाणा, क्र.४) गजानन सहकारी साखर कारखाना लि., सोनाजीनगर, जिल्हा-बीड, क्र.५) महेश (कडा) सहकारी साखर कारखाना लि., कडा, तालुका-आष्टी, जिल्हा-बीड, क्र.६) शिवाजीराव पाटील निलंगेकर ससाका लि., अंबुलगा, जि-लातूर, क्र.७) देवगिरी ससाका लि., फुलंब्री, जिल्हा-औरंगाबाद, क्र.८) स.म.स्व. बापूरावजी देशमुख सहकारी साखर कारखाना लि., वेळा, ता-हिंगणघाट, जिल्हा-वर्धा, क्र.९) जयकिसान सहकारी साखर कारखाना लि., बोदेगांव, तालुका-दारव्हा, जिल्हा-यवतमाळ, क्र.१०) स.म.दत्ताजीराव कदम सहकारी सूत गिरणी लि., कौलगे, ता-गडहिंग्लज, जिल्हा-कोल्हापूर, क्र.११) जय जवान जय किसान ससाका लि., नळेगांव, जिल्हा-लातूर

विक्री करावयाच्या संस्था

क्र.१२) तालुका शेतकरी दालमिल प्रक्रिया संस्था लि., मलकापूर, ता-उदगिर, जिल्हा-लातूर,

मोहोरबंद निविदेवर ठळक अक्षरात "भाडेतत्वावर" किंवा "विक्री" साठी असे उल्लेखीत करावी.

निविदेतील सविस्तर अटी / शर्ती तसेच माहिती दि.०५.०५.२०२२ पासून बँकेच्या Website: https://mscbank.com. वर उपलब्ध राहातील. निविदा प्रक्रियेच्या तारखा खालीलप्रमाणे

अ.क्र.	तपशील	दिनांक
१	निविदा फॉर्म विक्री	**क्र. १** ते **६** व **क्र.८** ते **१२** साठी ०५.०५.२०२२ ते १२.०५.२०२२ पर्यंत **क्र. ७** साठी दि.०५.०५.२०२२ ते दि.०३.०६.२०२२ पर्यंत
२	मालमत्ता पाहणी कार्यक्रम	दि.०९.०५.२०२२ (सकाळी १० ते सांयकाळी ५.०० वाजेपर्यंत)
३	• प्रि-बीड मिटींग	**क्र. १** ते **६** व **क्र.८** ते **१२** साठी दि.१०.०५.२०२२ **क्र.१** सकाळी १०.३० वाजता, **क्र.२** सकाळी ११.०० वाजता, **क्र.३** सकाळी ११.३० वाजता, **क्र.४** दुपारी १२.०० वाजता, **क्र.५** दुपारी १२.३० वाजता, **क्र.६** दुपारी ०१.०० वाजता, **क्र.८** दुपारी ०२.०० वाजता, **क्र.९** दुपारी ०२.३० वाजता, **क्र.१०** दुपारी ०३.०० वाजता, **क्र.११** दुपारी ०३.३० वाजता, **क्र.१२** दुपारी ०४.०० वाजता, **क्र.७** साठी दि.३१.०५.२०२२ रोजी दुपारी २.०० वाजता.
४	निविदा दाखल करण्याची अंतिम तारीख	**क्र. १** ते **६** व **क्र.८** ते **१२** साठी दि.१२.०५.२०२२ (सायं.५.०० पर्यंत) **क्र. ७** साठी दि.०३.०६.२०२२ (सायं.५.०० पर्यंत)
५	निविदा उघडण्याची तारीख	**क्र. १** ते **६** व **क्र.८** ते **१२** साठी दि.१३.०५.२०२२ **क्र.१** सकाळी १०.३० वाजता, **क्र.२** सकाळी ११.०० वाजता, **क्र.३** सकाळी ११.३० वाजता, **क्र.४** दुपारी १२.०० वाजता, **क्र.५** दुपारी १२.३० वाजता, **क्र.६** दुपारी ०१.०० वाजता, **क्र.८** दुपारी ०२.०० वाजता, **क्र.९** दुपारी ०२.३० वाजता, **क्र.१०** दुपारी ०३.०० वाजता, **क्र.११** दुपारी ०३.३० वाजता, **क्र.१२** दुपारी ०४.०० वाजता, **क्र.७** साठी दि.०४.०६.२०२२ रोजी दुपारी २.०० वाजता.

वैधानिक नोटीस

कर्जदार आणि जामिनदार यांना सूचित करण्यात येते की, राज्य सहकारी बँक व सहभागातील बँकांच्या एकूण कर्ज येणेबाकीचा भरणा निविदा उघडणेपूर्वी करावा. अन्यथा जप्त मालमत्ता भाडयाने देऊन कर्ज वसुली केली जाईल. तसेच भाडे प्राप्त रकमेतून संपूर्ण वसुली न झाल्यास उर्वरित कर्जबाकी व्याज व इतर खर्चासह आपणांकडून वसुली केली जाईल याची नोंद घ्यावी.

यापुर्वी अ.क्र.१ ते ६ व अ.क्र.८ ते ११ या संस्थांची ३० दिवसाची नोटीस दै. लोकसत्ता व दैनिक फायनान्सियल एक्स्प्रेसमध्ये जाहिरात प्रस्तावित केली होती. त्यामुळे ३० दिवसांची वैधानिक तरतुदीची पूर्तता झालेली आहे.

सही/-
(डॉ. अजित देशमुख)
व्यवस्थापकीय संचालक तथा प्राधिकृत अधिकारी
दि महाराष्ट्र स्टेट को-ऑपरेटिव्ह बँक लि., मुंबई

दिनांक : ०५.०५.२०२२
स्थळ : मुंबई

TATA
TATA STEEL LIMITED
Registered Offce: Bombay House, 24, Homi Mody Street, Fort, Mumbai - 400 001 India
Tel.: 91 22 6665 8282 • Fax No.: 91 22 6665 7724 • Email: cosec@tatasteel.com • Website: www.tatasteel.com
CIN: L27100MH1907PLC000260

सूचना

३१ मार्च, २०२२ रोजी संपलेल्या तिमाही/बारा महिन्यांसाठी अलिप्त वित्तीय निष्कर्षांचा उतारा

₹ कोटी

तपशील	३१.०३.२०२२ रोजी संपलेली तिमाही	३१.१२.२०२१ रोजी संपलेली तिमाही	३१.०३.२०२१ रोजी संपलेली तिमाही	३१.०३.२०२२ रोजी संपलेले आर्थिक वर्ष	३१.०३.२०२१ रोजी संपलेले आर्थिक वर्ष
	लेखापरिक्षित	लेखापरिक्षित	लेखापरिक्षित	लेखापरिक्षित	लेखापरिक्षित
प्रवर्तनातून एकूण महसूल	३६,६८०.९३	३१,९६४.२५	२७,३५५.४३	१,२९,०२१.३५	८४,१३२.९२
कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (कर आणि अपवादात्मक बाबींपूर्वी)	१०,७१५.०४	१०,४४३.६६	९,५८८.९६	४४,३२६.१०	१७,८६८.५४
कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक बाबींनंतर)	१०,६३८.५९	१०,२६२.६९	१०,५३८.२२	४४,०९०.६५	१८,६०९.८४
कालावधीसाठी करोत्तर निव्वळ नफा/(तोटा)	७,८३९.४६	७,६८३.३९	८,१२९.६५	३३,०११.१८	१७,०७७.९७
कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीसाठी नफा/(तोटा) (करोत्तर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करोत्तर) धरून)	८,१८७.१५	७,८३६.९९	८,४९३.५३	३३,७०६.०८	१७,४८९.३८
भरणा झालेले समभाग भांडवल (दर्शनी मूल्य ₹ १० प्रति भाग)	१,२२२.३७	१,२२२.३३	१,१९८.७८	१,२२२.३७	१,१९८.७८
पुनर्मुल्यांकित राखीव वगळून राखीव				१,२४,२११.३९	९३,२११.३४
सिक्युरिटीज प्रिमियम रिझर्व्ह				३१,२८८.८९	३०,९६४.७६
नेट वर्थ	१,२५,४३३.७६	१,१७,२४४.१७	९५,१८५.१२	१,२५,४३३.७६	९५,१८५.१२
भरणा झालेले कर्ज भांडवल				१३,६७४.९९	१३,५६७.६०
निव्वळ डेब्ट इक्विटी रेशो	०.३०	०.२७	०.३२	०.३०	०.३२
प्रत्येकी ₹ १० ची मूलभूत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर)	६४.१४	६२.८८	६९.२८	२७०.३३	१४५.००
प्रत्येकी ₹ १० ची सौम्यिकृत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर)	६४.१२	६२.८५	६८.८८	२७०.१३	१४४.९९
डिबेंचर विमोचन राखीव	२,०४६.००	२,०४६.००	२,०४६.००	२,०४६.००	२,०४६.००
डेब्ट सर्व्हिस कव्हरेज रेशो	१०.८२	१६.०६	५.५५	१४.३६	३.६०
इंटरेस्ट सर्व्हिस कव्हरेज रेशो	२८.८३	२३.१६	१४.५६	२२.८४	५.८१

३१ मार्च, २०२२ रोजी संपलेल्या तिमाही/बारा महिन्यांसाठी एकत्रित वित्तीय निष्कर्षांचा उतारा

₹ कोटी

तपशील	३१.०३.२०२२ रोजी संपलेली तिमाही	३१.१२.२०२१ रोजी संपलेली तिमाही	३१.०३.२०२१ रोजी संपलेली तिमाही	३१.०३.२०२२ रोजी संपलेले आर्थिक वर्ष	३१.०३.२०२१ रोजी संपलेले आर्थिक वर्ष
	अलेखापरिक्षित	अलेखापरिक्षित	अलेखापरिक्षित	लेखापरिक्षित	लेखापरिक्षित
प्रवर्तनातून एकूण महसूल	६९,३२३.५०	६०,७८३.११	५०,०२८.३७	२,४३,९५९.१७	१,५६,४७७.४०
कालावधीसाठी निव्वळ नफा/(तोटा) (कर आणि अपवादात्मक बाबींपूर्वी)	१२,१३९.२६	१२,३५८.९८	१०,३४७.९९	५०,३६०.९३	१४,८८६.८५
कालावधीसाठी करपूर्व निव्वळ नफा/(तोटा) (अपवादात्मक बाबींनंतर)	११,८६४.९७	१२,१६५.५८	९,३५६.८६	५०,२२६.८७	१३,८४३.६९
कालावधीसाठी करोत्तर निव्वळ नफा/(तोटा)	९,८३५.१२	९,५९८.१६	७,१६१.९१	४१,७४९.३२	८,१८९.७९
कालावधीसाठी एकूण सर्वसमावेशक उत्पन्न (कालावधीसाठी नफा/(तोटा) (करोत्तर) आणि इतर सर्वसमावेशक उत्पन्न (करोत्तर) धरून)	१०,३५३.७४	१०,४८५.४६	६,१३१.०३	४३,०५४.७४	९७८.७८
भरणा झालेले समभाग भांडवल (दर्शनी मूल्य ₹ १० प्रति भाग)	१,२२१.२१	१,२२१.१७	१,१९७.६१	१,२२१.२१	१,१९७.६१
राखीव (पुनर्मुल्यांकित राखीव वगळून) आणि अनियंत्रक व्याज				१,१५,८७७.२५	७५,५३५.८४
नेटवर्थ	१,१४,४४३.०४	१,०४,१८२.७१	७४,२३८.७७	१,१४,४४३.०४	७४,२३८.७७
निव्वळ डेब्ट इक्विटी रेशो	०.५२	०.६८	०.९८	०.५२	०.९८
प्रति समभाग प्राप्ती					
प्रत्येकी ₹ १० ची मूलभूत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत (अपवादात्मक बाबींनंतर)	७९.९१	७९.१०	५७.५३	३३२.३५	६३.७८
प्रत्येकी ₹ १० ची सौम्यिकृत प्रति भाग प्राप्ती (अवार्षिक)-रुपयांत अपवादात्मक बाबींनंतर)	७९.८८	७९.०६	५७.१९	३३२.०९	६३.७८
डिबेंचर विमोचन राखीव	२,०४६.००	२,०४६.००	२,०४६.००	२,०४६.००	२,०४६.००
डेब्ट सर्व्हिस कव्हरेज रेशो	९.७४	९.३७	४.३६	९.१८	२.२३
इंटरेस्ट सर्व्हिस कव्हरेज रेशो	१७.५९	१२.५७	८.२९	१२.८२	३.३९

टीप :
सेबी (लिस्टिंग अँड अदर डिस्क्लोजर रिक्वायरमेंटस्) रेग्युलेशन्स, २०१५ च्या रेग्युलेशन ३३ आणि रेग्युलेशन ५२ अंतर्गत स्टॉक एक्स्चेंजेसमध्ये सादर केलेल्या ३१ मार्च, २०२२ रोजी संपलेल्या तिमाही/बारा महिन्यांसाठी अलिप्त आणि एकत्रित वित्तीय निष्कर्षांच्या तपशीलवार विवरणाचा वरील एक उतारा आहे. ३१ मार्च, २०२२ रोजी संपलेल्या तिमाही/बारा महिन्यांसाठी अलिप्त आणि एकत्रित निष्कर्षांचे संपूर्ण विवरण स्टॉक एक्स्चेंजेसच्या वेबसाईटस् (www.nseindia.com/www.bseindia.com) आणि कंपनीची वेबसाईट (www.tatasteel.com) वर उपलब्ध आहे.

टी. व्ही. नरेंद्रन
मुख्य कार्यकारी अधिकारी आणि
व्यवस्थापकीय संचालक

कौशिक चॅटर्जी
कार्यकारी संचालक आणि
मुख्य वित्तीय अधिकारी

मुंबई : ०३ मे, २०२२

TATA STEEL